स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 18–05–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 14. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 15. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 16. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 99**:– नदी स्वच्छता अभियान (2018) अतंर्गत, झोननिहाय क्षेत्रातील, **{कारखाना विभाग}** स्ट्रेच प्रमाणे नदी काठी जमा होणारा गाळ/साहित्य/मटेरियल्स वाहुन नेण्याकरीता, प्रति स्ट्रेच 02 नग असे 10 स्ट्रेच करीता 20 नग टिप्पर भाडेतत्वावर घेण्याकरीता खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येते.

1) सहा. आयुक्त व झोनल अधिकारी (स्व.) याच्यातर्फे स्ट्रेच नुसार मागणी झालेले टिप्पर भाडेतत्वावर घेण्याकरीता वार्षीक दरकरारात नमुद कंत्राटदार मे. एम.एम. ईजिनिअरींग वर्क्स व भावना उके यांच्यातर्फे वेळेवर मागणीकेलेली टिप्पर उपलब्ध होत नसल्याचे र्निदेशनात आल्यास, दरकरारातील दरावर किंवा त्यापेक्षा कमी दरावर खुल्या बाजारातुन टिप्पर उपलब्ध करण्याची मान्यता प्रदान करावी.
2) उक्त कार्याकरीता भाडेतत्वावर घेण्यात येणा-या टिप्परचे देयके नियमाप्रमाणे रितसर कार्यवाही अन्वये, आरोग्य विभागातील पद क्र.A43401171602 अतंर्गत किंवा त्या-त्या

झोनच्या सबंधित पदाअतंर्गत आरोग्य विभाग किंवा झोनतर्फे काढण्याची मान्यता प्रदान करावी.

3) स्थायी समिती ठराव क्र. 299, दि. 11/12/2017 व मा. आयुक्त, यांच्या दि. 22/12/2017 रोजी मंजूरी अन्वये वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याचे व्दिवार्षीक दरकरार कार्यान्वीत होईपर्यत वार्षीक दरकरारास मुदतवाढीची मान्यता प्राप्त आहे. वाहने/मशिनरी भाडेतत्वावर घेण्याच्या दरकरार अतंर्गत 09 टन क्षमतेच्या टिप्परचे दर रु. 40 प्रति किलोमिटर असुन प्रति दिवस 100 किलोमिटर प्रमाणे सरासरी 01 दिवसाचा खर्च 4000/- रु. अपेक्षित असुन 20 टिप्परचा प्रतिदिन खर्च रु. 80,000/- येईल. असे दि. 07/05/2018 ते दि. 20/06/2018 या कालावधीत, 10 स्ट्रेच करीता सरासरी 37,60,000/- खर्च अपेक्षित आहे. तसेच खर्च कमी जास्त होऊ शकतो.

करीता, नदी स्वच्छता अभियान (2018) अतंर्गत, झोननिहाय क्षेत्रातील, स्ट्रेच प्रमाणे नदी काठी जमा होणारा गाळ/साहित्य/मटेरियल्स वाहुन नेण्याकरीता, प्रति स्ट्रेच 02 नग टिप्पर झोन निहाय, भाडेतत्वावर घेण्याच्या तसेच अ.क्र. 1 ते 3 वरील प्रस्ताव मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

**ठराव क्रमांक 100:–** {शिक्षण विभाग}

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे वर्ष 2007 पासून वर्ग 1 ते 12 ''**जनश्री**'' योजना तसेच वर्ग 9 ते 12 विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू स्थायी समिती ठराव क्र. 243, दि. 24.01.2008 अन्वये करण्यात आली होती. त्या योजनेद्वारा प्रती विद्यार्थी रू. 200/– पैकी म.न.पा. रू. 50/– राज्य शासन रू. 50/– व केंद्र शासन रू. 100/– याप्रमाणे हिस्सा मिळून एकूण रू. 200/– हप्ता भारतीय जीवन विमा निगम योजना (P&GS) तर्फे वर्ष 2017 पर्यंत हप्ता भरणा सुरू होता.

योजना वर्षे 2007 पासून सुरू असतांना वर्ष 2016 पर्यंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/मृत्यू लाभ देण्यात आली त्यामध्ये एकंदरीत म.न.पा. व शासन स्तरावर भरण्यात आलेल्या हप्त्याच्या तुलनेत विमा कंपनीतर्फे दिलेला लाभ हा अधिक मोठया प्रमाणात झाला आहे. त्यामुळे सदर नविन योजना सुरू करणे विद्यार्थ्यांसाठी अधिक फायदेशीर आहे.

LIC विभागातर्फे अभिसरण (Converge) करून जिवन ज्योती योजना/प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMJJBY) या नावाने सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ LIC कडे भरणा करण्यासाठी सध्या गत वर्षीच्या आकडेवाढीनुसार एकूण 12998 विद्यार्थांसाठी प्रति विद्यार्थी रू. 342/– प्रमाणे एकूण रू. 44,45,316/– नविन योजनेसाठी वार्षीक भरणा करायचे आहे. या योजनेसाठी राज्यशासनातर्फे प्रति विद्यार्थी 50% रू. 171/– व म.न.पा. 50% रू. 171/– असे दोन्ही हिस्सा मिळून रू. 342/– LIC ला भरणा करावा लागणार आहे. त्यासाठी सर्वप्रथम शासनातर्फे या योजनेला लागणाऱ्या अनुदानाच्या हप्त्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. नविन योजना निरंतर सुरू राहील्यास विद्यार्थ्यांना/पाल्यांना मोठया प्रमाणात त्याचा लाभ देण्यास मदत होणार आहे. शासनातर्फे अनुदान प्राप्त होईस्तोवर किंवा प्राप्त न झाल्यास म.न.पा. ला असे सर्व हप्ते निरंतर भरण्याचा तसेच हा खर्च आय–व्यय पद क्र.A25002021306 मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विस्तृत माहितीसह अहवाल सादर करावा यासह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली

**ठराव क्रमांक 101:–** {लोककर्म झोन 08}

प्रभाग क्र. ३६, भाडेवाडी डंम्पीग यार्ड येथील संरक्षण भिंत बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदेतील निविदाकार मे. प्रगती कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १.०टक्के कमी दराची रू. ४४,२२,५७०/– रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सन 2018–19 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास मनपा सभागृहाची अंतिम मंजुरी प्राप्त

झाल्यावर उपरोक्त प्रस्ताव स्थायी समिती समोर प्रावधान नोंदवून प्रस्तावित विषय परत सादर करावा या सुचनेसह विषययास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 102:—** {आरोग्य विभाग}

प्रभाग क्र.१८/अ चे मा.नगरसेवक श्री.प्रविण प्रभाकरराव दटके यांच्या वार्ड निधीतुन खरेदी केलेल्या २ शीत शवपेटया हया स्व.श्री. प्रभाकरराव दटके, रोगनिदान केंद्र, महाल येथे ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर शित शवपेटया हया मृतकाचे पार्थिव शरीर ठेवण्याकरीता उपयोगी पडते.

उपरोक्त शित शवपेटयांचे देखभाल व रखरखाव ठेवण्याच्या दृष्टीने शित शवपेटी मागणी करणाऱ्या नागरीकाकडुन शित शवपेटीचे नाममात्र शुल्क आकारण्यात यावे, असे मा.नगरसेवक श्री.प्रविणजी दटके यांनी चर्चेद्वारे सुचविले आहे.

याकरीता शित शवपेटी नेणाऱ्या नातेवाईकाकडुन रु.२०००/- अनामत रक्कम ठेवुन शित शवपेटी परत केल्यानंतर रु.३००/- फक्त शुल्क आकारुन उर्वरित अनामत रक्कम परत करण्याबाबतचा विषय स्थायी समितीने मंजूरीकरीता विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 103:—** {विद्युत विभाग}

"शहरातील मुख्य रस्त्यांवरील व मोठी मैदाने येथील पारंपारीक पथदिवे एल.ई.डी. पथदिव्यांनी उर्जा बचतीच्या रकमेतून खर्च वळता करण्याच्या धर्तीवर बदलणे तसेच या दिव्यांच्या यंत्रणेचे मजबूतीकरण (निकामी केबल्स बदलणे, तुटलेल्या खांबांच्या ठिकाणी नविन खांब बसविणे इ.) करणे" या कामाचे में. जे.के. सोल्यूशन्स इंक, नागपूर यांना कार्यादेश क्र. एल.डी./ई.ई./०१/३९८, दि. १७.०५.२०१४ अन्वये देण्यात आलेले कंत्राट रद्द का करु नये याकरीता त्यांना देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस क्र. एल.डी./ई.ई./२२३, दि. १६.०७.२०१६, या नोटीसवर त्यांनी दि. १८.०८.२०१६ चे पत्रान्वये सादर केलेले उत्तर, त्यानंतर दि. २३.११.२ त्यांनी मा. आयुक्त यांचे समक्ष दि. २५.११.२०१६ ला त्यांची मांडलेली बाजू, तद्नंतर दि. ०६.१२.२०१६ च्या पत्रान्वये त्यांनी हे कंत्राट रद्द करण्याच्या स्थितीत त्यांना नागपूर महानगरपालिकेने कोणकोणत्या बाबींकरीता भुगतान करावे त्याबाबतचा कळवलेला खालील तपशील,

१) त्यांचे थकीत देयकाची तपासणी करुन नागपूर महानगरपालिकेने शक्य तितक्या लवकर भुगतान करावे,
२) त्यांचे तिसरे धावते देयकाचे रु. ५,४०,८२,२६३/- चे भुगतान त्वरीत करण्यात यावे,
३) उक्त पत्रासोबत त्यांनी रु. २,९०,६४,०५२/- चे चौथे धावते देयकाचे भुगतान करावे,
४) त्यांनी एल.ई.डी. स्ट्रीट लाईटस् खरेदीकरता खर्च केलेली राशी रु. १,२९,२२,४९२/- चे भुगतान करावे,
५) अनु क्र. ४ वरील रकमेवर १२.९५% येणारे व्याजाचे रु. ३७,६५,२९१/- नमूद केले आहे. चे भुगतान करावे,
६) अनु क्र. ४ वर नमूद एल.ई.डी. दिवे लावल्यामुळे झालेली विजेची बचत रु. ३६,९६,१३३/- चे भुगतान करावे,
७) करारनाम्यानुसार ४० दिवसांत भुगतान न केल्यामुळे १२% दराने देय व्याजाची रक्कम रु. २१,६८,६६०/- चे भुगतान करावे,
८) त्यांनी अमरावती रोडवर कंट्रोल रुम तयार करण्याकरीता झालेल्या रु. २ कोटीच्या खर्चाची भरपाई करण्यात यावी,
९) त्यांना या कामामुळे मिळालेल्या संधीस मुकावे लागल्याने कंपनीची विश्वासार्हता गमावल्यामुळे झालेल्या नुकसान भरपाईपोटी रु. ३ कोटी चे भुगतान करण्यात यावे,
१०) केबल च्या कार्यान्वयन करणेपोटी कपात केलेली १५% रक्कम रु. ४,३५,४४८/- चे भुगतान करावे,
११) त्याचप्रमाणे 'प्रथम' व 'द्वितीय' धावते देयकातून वजा केलेली सुरक्षा ठेव अनुक्रमे रु. १३,५७,७६८/- व रु. ७,६७,०४२/- चे भुगतान करावे,
१२) त्याचप्रमाणे त्यांना त्यांची अनामत रक्कम रु. १,१८,००,०००/- परत करावी,

त्याचप्रमाणे 'ट्रायपार्टीट अॅग्रीमेंट' किंवा 'एस्क्रो अकाऊंट' देण्यास न मिळालेल्या प्रतीसादामुळे काम करण्यामधे त्यांना आलेल्या अडचणी तसेच नागपूर महानगरपालिकेच्या आर्थीक अडचणींमुळे नागपूर महानगरपालिका विहीत मुदतीत भुगतान करु न शकण्याची त्यांनी लक्षात घेतलेली बाब व त्या अनुषंगाने हे कंत्राट रद्य करण्यास त्यांनी दर्शवलेली सहमती व त्यांचे एकूण रु. १७,००,५९,१५९/- या देय रकमेचे भुगतान करण्यास केलेली विनंती अन्यथा 'अब्रीट्रेशन' च्या प्रोसेसनुसार या प्रकरणात पुढे जाण्याचा ठेवलेला प्रस्ताव,

वरील सर्व बाबींचा विचार करता कंत्राटदाराने त्यांना देण्यात आलेले कंत्राट निविदेतील अटी शर्तीनुसार पूर्ण न केल्याने नागपूर महानगरपालिकेचे जे नुकसान झाले त्याबाबतही विचार करणे आवश्यक आहे त्या संदर्भातील खालील तपशीलाच्या अनुषंगाने,

१) कंत्राटदाराने इन्फ्रस्ट्रक्चर स्ट्रेंदनींगचे संपूर्ण काम एकूण १८ महिन्यांच्या काळात व यातील कंट्रोलर्स बसविण्याचे काम १२ महिन्यांचे काळात (कार्यादेश दिल्यानंतर) करणे बंधनकारक होते असण्याचा विचार करता या कामाची दंड आकारण्याकरीता ग्राहय धरण्याची राशी (या कामातील कंट्रोलर्स ची संख्या योग्य नियोजनाने कमी झालेली असल्याचा विचार करता व जवळपास रु. ५ कोटी रकमेचे काम कंत्राटदाराने केलेले असल्याचा विचार करता) रु. ३३.४१ कोटी होते, व यावर १०% दराने आकारावयाची दंडात्मक रक्कम रु. ३.३४ कोटी होते याचा विचार करता,

२) कार्यादेश दिल्यानंतरच्या एकूण १८ महिन्यांचे काळात संपूर्ण २६,७१२ पारंपारीक पथदिवे एल. ई.डी. पथदिव्यांनी बदलण्याने वार्षीक उर्जा बचतीची रक्कम रु. ९.१६ कोटी झाली असती व या बचतीचा १०% हिस्सा नागपूर महानगरपालिकेला मिळाला असता ती राशी रु. ०.९१६ कोटी होत असण्याचा विचार करता, या १८ महिन्यांचे काळात प्रथम तीन महिन्यांच्या अवधीनंतर या पथदिवे बदलण्याच्या कामास सुरुवात करुन उर्वरीत १५ महिन्यांचे काळात हे काम करणे कंत्राटदारास बंधनकारक होते, यादृष्टीने विचार करता व या १५ महिन्यांच्या काळातील टप्पा-टप्पाने होऊ शकणा-या नागपूर महानगरपालिकेच्या बचतीतील हिश्याची राशी रु. ६१.०८ लक्ष होत असण्याचा विचार करता व तद्नंतरच्या डिसेंबर २०१६ पर्यंतच्या १४ महिन्यातील अश्या हिश्याची राशी रु. १.२४ कोटी होत असण्याचा विचार करता व याप्रमाणे उर्जा बचतीच्या ज्या हिश्यास नागपूर महानगरपालिकेस मुकावे लागले ती एकूण राशी रु.१.८५ कोटी होत असण्याचा विचार करता यातील कंत्राटदाराने जे एल.ई.डी. लावले त्यामुळे झालेल्या १००% बचतीची राशी नागपूर महानगरपालिकेकडे सुरक्षीत आहे याचा विचार करता व यातील ९०% हिश्याची कंत्राटदाराने मागणी केलेली राशी रु. ३६.९६ लक्ष आहे याचा विचार करता,

३) त्याचप्रमाणे देखभाल दुरुस्तीचे काम सदर कंत्राटदाराने बंद केल्याने इतर कंत्राटदारांकडुन जे काम महानगरपालिकेस करवून घ्यावे लागत आहे अश्या कामाची रक्कमही कंत्राटदाराकडुन वसुल करावी लागणार आहे याचा विचार करता,

व याप्रमाणे उक्त (१) ते (३) वरील बाबींचा विचार करता तसेच कंत्राटदाराने दिनांक ०६/१२/२०१६ च्या पत्रान्वये मागणी केलेल्या रकमेचा विचार करता कंत्राटदारास नेमकी किती रक्कम देय होते व कंत्राटदाराकडुन वसुल करावयाची रक्कम किती होते याबाबत निष्कर्षापर्यंत पोहचण्यास अवधी लागणार असल्याने याबाबतीत योग्य पडताळणी करुन निर्णय घेण्याचे अधिन राहून तसेच सद्यःस्थितीत कंत्राटदाराने काम बंद केलेले असल्याची बाब विचारात घेता में. जे. के. सोल्यूशन्स इंक, नागपूर, यांना कार्यादेश क्र. एल.डी./ई.ई./०१/३९८, दि. १७.०५.२०१४ अन्वये देण्यात आलेले कंत्राट रदद् करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. ८८७ दि. २७/१२/२०१६ अन्वये मंजूरी प्रदान केलेली असल्याची बाब विचारात घेता या प्रकरणी पडताळणी केली असता मे. जे.के. सोल्यूशन्स इंक, नागपूर, यानी प्रत्यक्षात केलेल्या रु. १०,१५,३७,४८० /- चे भुगताना व्यतीरीक्त वर नमूद केल्यानुसार नुकसान भरपाई रुपाने द्यावयाची रक्कम रु. ५,५९,३३,९५१/- होते व नागपूर महानगरपालिकेला मे. जे.के. सोल्यूशन्स इंक, नागपूर, यांचेकडून वसुल करावयाची रक्कम रु. ५,१९,१०,०००/- होते याचा विचार करता कंत्राटदाराने मागीतलेली कोणतीही नुकसान भरपाई नागपूर महानगरपालिकेला देय राहणार नाही तसेच कंत्राटदारालाही नागपूर

महानगरपालिकेस कोणतीही नुकसान भरपाई देय राहणार नाही अशी भुमीका घेऊन मे. जे.के. सोल्यूशन्स इंक, नागपूर, यांनी प्रत्यक्षात केलेल्या कामाची देय रक्कम रु. १०,१५,३७,४८०/- चे भुगतान मे. जे.के. सोल्यूशन्स इंक, नागपूर, यांना या प्रकरणी फुल ॲंड फायनल सेटलमेंट या रुपाने मान्य आहे व या कामाच्या भुगतानाबाबत ते पुढे कोणताही दावा न्यायालयात करणार नाही असे लेखी स्वरुपात त्यांचेकडून प्राप्त करवून घेण्याचे अटीवर मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 104 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर